# एम.बी.मोरे महिला महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १८९ वी जयंती उस्ताहात साजरी

रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम.बी.मोरे फाऊंडेशनचे कला वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १८९ वी जयंती उस्ताहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाची सुरवात इतिहास विभाग प्रमुख प्रा. माधुरी जाधव यांनी दिपप्रज्वलन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन केली. यावेळी प्रा.माधुरी जाधव यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. १८ व्या शतकात स्त्रियांना घराबाहेर पडण्यास मुभा नव्हती अशा परिस्थितीत महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजाच्या हालअपेष्टा सहन करून मुलींना शिक्षण देण्याचे कार्य केले त्यांच्यामुळेच मुलींना आज प्रत्येक क्षेत्रात कार्य करत असताना दिसून येतात. त्याच्या क्रार्याविषयी स्मृतीत उजाळा देण्यासाठी महाविद्यालयातील व्दितीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थिनी कु.श्रृती अनिल खराडे हिने सावित्रीबाईची वेशभुषा केली होती. तसेच आपल्या काव्यातून तिने आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात अनेक विद्यार्थीनींनी उत्स्फुर्त सहभाग दर्शविला.

या कार्यक्रमाला महिला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हसळकर आणि सर्व प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रा. दिपेश भोसले सर यांनी केले.